

# पुणे विद्यापीठ

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ

**विद्यार्थी कल्याण मंडळ**

**डॉ. पंडीत एन. शेळके**

एम.एस.सी., पी.एच.डी.

संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ

संदर्भ क्र.: विकमं/२०१३–१४/ ०१९ दिनांक : २६/०६/२०१३.

प्रति,

**मा. प्राचार्य / मा. संचालक/ मा. विभागप्रमुख,**

पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व

महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

पुणे विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग.

**विषय :– मानवी अवयक प्रत्यारोपन कायद्यांतर्गत केडेव्हर ऑर्गन डोनेशनमध्ये वाढ करण्याबाबत....**

**संदर्भ क्र. : राजभवन कार्यालयाचे सीएस/जेबीव्हीसी/१३/(७८६१)/१७९२, दि. १५/०६/२०१३.**

**महोदय/महोदया,**

महामहिम राज्यपाल तथा मा. कुलपती पुणे विद्यापीठ, पुणे याचेकडील उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, पुणे विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था व विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभागात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी मानवी अवयव प्रत्योरापन करण्याबाबतचे संबंधित पत्र आपल्या अवलोकनार्थ सोबत जोडलेले आहे.

सदरची पत्रे आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील/विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभागांतील सूचना फलकांवर प्रदर्शित करुन विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणून द्यावीत व याबाबत विद्यार्थ्यांना प्रवेश घेते वेळी आपण आवाहन करुन आपल्यास्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

सदर कार्यवाहीचा अहवाल मा. सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई– ४०० ०३५ यांचे कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक असल्यामुळे वरीलप्रमाणे आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे – ४११ ००७ या कार्यालयास पाठविण्यात यावा, ही विनंती.

कळावे,

27/6/13

**सोबत : वरीलप्रमाणे.**

(डॉ. पंडित एन्. शेळके)

संचालक,

विद्यार्थी कल्याण मंडळ

SECRETARY TO THE GOVERNOR * MAHARASHTRA *

मा कुलगुरु यांचे कार्यालय
पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 22 JUN 2013
आवक क्रमांक व्हीसी 3308
जावक दिनांक 24/06/2013

CS/JBVC/13/(7861)/1792.

RAJ BHAVAN
MALABAR HILL
MUMBAI 400 035

15 June 2013

Dear Dr. Gade,

I am directed to enclose herewith a copy of the letter dated 4th June 2013 which the Minister for Public Health and Family Welfare has written to the Governor requesting that the Vice-Chancellors of the Universities in the State may be requested to implement the incorporation of organ donation pledges on students identity card through their respective affiliated Colleges from this academic year, for your information and taking necessary steps in this regard in consultation with the officials from the Public Health and Family Welfare Department.

The Chancellor also intends to take a review of the steps taken by the Universities in the ensuing meeting of the Joint Board of Vice-Chancellors.

With regards,

B.S.W. 24.6.2013

Yours Sincerely

(Vikas Chandra Rastogi)

Dr. W. N. Gade,
Vice-Chancellor,
University of Pune,
Ganeshkhind,
Pune- 411007.

महत्वाचे

NO - HOTA- 2012/CR-375/Health-

कुलपति सचिव कार्यालय
13 ... 13
N-872508

MINISTER MAHARASHTRA STATE

MINISTER FOR
PUBLIC HEALTH AND FAMILY
WELFARE AND PROTOCOL

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Mantralaya, Mumbai 400 032
www.maharashtra.gov.in
Date: 4 June, 2013.

Hon'ble Governor,

The Government has, of late, taken certain proactive steps to encourage human organ transplantation. These include, inter-aila, compulsory declaration of brain-dead patients, registration of Non-Transplant Organ Retrieval Centres (NTORCs) and compulsory seeking the consent of the relatives of the brain-dead patients for organ donation. All these steps have helped in promoting cadaver organ transplantation in the State.

To supplement these efforts in organ transplantation, it is thought that Organ Donation Pledges could be incorporated in the Motor Vehicle Licences and Student Identity Cards. The Department of Transport has agreed to incorporate the Pledges on licences and the process in this direction has commenced. Meanwhile, incorporating the Organ Donation Pledges on Student Identity Cards will be an effective step not only in promoting organ transplantation, but in inculcating a sense of social responsibility among the student community.

I shall be grateful if Your Excellency instructs the Vice Chancellors of Universities, who, in turn, can implement the incorporation of Organ Donation Pledges on Student Identity Cards through their respective affiliated colleges, from this academic year. Officers of the Public Health Department will offer all possible assistance in this regard.

Thank you.

Yours sincerely,

(Suresh Shetty)

Shri. K. Shankarnarayanan
Hon'ble Governor
State of Maharashtra
Rajbhavan, Malbar Hill,
Mumbai – 400 035

GS
4-6-13

7/6

US(E)
Submitted through NIC on 13.6.2013. Pl. B/f. for JB/ve discussion

FMO 13/6

889

6079
06/6/13

अ.शा.प.क्र.मोअप्र - २०१२/प्र.क्र.७०/१४/आरोग्य-२

मुलगी वाचवा
save the girl child

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
मंत्रालय
गोकुळदास तेजपाल रुग्णालय कॉम्प्लेक्स बिल्डींग,
१०वा मजला, मुंबई ४०० ००१
दुरध्वनी : कार्यालय - ०२२-२२६१७३८८ फॅक्स : २२६१७९९९
ई-मेल : sec_pubhealth@maharashtra.gov.in
acspubhealth@gmail.com

टी. सी. बेंजामिन
अपर मुख्य सचिव
*T. C. Benjamin*
Addl. Chief Secretary

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Public Health Department
Mantralaya
Gokuldas Tejpal Hospital Complex Building,
10th Floor, Mumbai - 400 001.
Phone : 022-22617388 Fax : 022-22617999
Email: sec_pubhealth@maharashtra.gov.in
acspubhealth@gmail.com

कुलपति सचिव कार्यालय
28 MAY 2013
N - 52853
क्र.

दिनांक १८ मे, २०१३.

विषय :- मानवी अवयव प्रत्यारोपण कायद्यांतर्गत कॅडेव्हर ऑर्गन डोनेशनमध्ये वाढ करण्याबाबत.

प्रिय श्री. रस्तोगी,

महाराष्ट्र राज्यात मानवी शरिरातील विविध अवयव निकामी झालेले लाखोंच्या संख्येत गंभीर रुग्ण मृत्यू शय्येवर अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रीयेच्या प्रतिक्षेत आहेत. त्यांना आवश्यक ते अवयव, प्रत्यारोपण शस्त्रक्रीयेसाठी उपलब्ध झाल्यास त्यांच्यावर अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रीया होऊन त्यांना जीवनदान मिळू शकते. यासाठी राज्यात एकूण ९५ रुग्णालयांना विविध अवयव प्रत्यारोपणासाठी नोंदणी करुन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच अवयव काढण्यासाठी रिट्रायव्हल सेंटर्सनाही मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु राज्यात अवयव दानाचे प्रमाण खूपच कमी असल्याने आवश्यक तेवढे अवयव, प्रत्यारोपणासाठी उपलब्ध न झाल्याने रुग्ण अवयवदानाच्या प्रतीक्षेत मृत्यू पावतात.

मानवी अवयव प्रत्यारोपण कायद्यांतर्गत जास्तीतजास्त अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रीया होण्यासाठी अवयव दान करणाऱ्यांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. यासाठी समाजातील विविध क्षेत्रामध्ये जनजागृती होऊन अवयव दानाचे महत्व समाजातील सर्व स्तरातील व्यक्तींपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. त्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत आरोग्य शिक्षण, माहिती व जनसंपर्क कार्यालय, पुणे मार्फत जनजागृतीपर विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

अवयव दान वाढविण्याचा एक उपाय म्हणून वाहन व इतर अपघातात डोक्याला मार लागून गंभीर जखमी झालेल्या रुग्णांमधील **ब्रेन स्टेम डेथ** झालेल्या रुग्णाच्या नातेवाईकांनी अवयव दान करण्यास संमती दिल्यास अशा रुग्णांमधील अवयव काढून तो प्रत्यारोपण शस्त्रक्रीयेसाठी वापरण्यात येऊ शकतो. अशा नाजूक परिस्थितीत नातेवाईकांना समुपदेशन करुन अवयव दानासाठी त्यांचे मन परिवर्तन करुन संमती प्राप्त करणे जिकरीचे होते. अशा परिस्थितीत जर विद्यार्थ्यांच्या **महाविद्यालयीन ओळखपत्रावर** तो **ऑर्गन डोनर** असल्याबाबत उल्लेख असेल तर ती बाब त्याच्या नातेवाईकांच्या निदर्शनास आणून त्यांची संमती मिळविणे सोपे जाईल.

28/5
VS(E)
P.I. put up as discussed
29.5.13
884

मानवी अवयव प्रत्यारोपण कायद्यांतर्गत राज्यात कॅडेव्हर ऑर्गन डोनेशनच्या संख्येत वाढ करण्यासाठी शासन आदेशान्वये राज्यातील रुग्णालयांना **ब्रेन स्टेम डेथ** घोषित करुन प्रमाणित करणे आवश्यक करण्यात आले आहे. अवयव दानाचे महत्व व जनजागृती करण्याचा शासनाने संकल्प केला असून त्याचाच एक भाग म्हणून तरुण वर्गात जनजागृती करुन विशेषतः पदवी शिक्षणासाठी (वैद्यकीय, अभियांत्रिकी, तंत्र, कृषि, इतर पदवी इ.) महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या **वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या** विद्यार्थ्यांकडून कॉलेज प्रवेशासाठी अर्ज भरुन घेताना, दुर्देवाने वाहन व इतर अपघातात त्याच्या डोक्याला मार लागून **ब्रेन स्टेम डेथ** घडल्यास अशा परिस्थितीत तो विद्यार्थी अवयव दानास इच्छुक आहे किंवा कसे, असल्यास कोणते अवयव दान करु इच्छितो याबाबत होय किंवा नाही याप्रमाणे उल्लेख करुन घेणे आवश्यक करण्यात यावे. तसेच जे विद्यार्थी स्वेच्छेने अवयव दान करण्यास होकार दर्शवितील अशा विद्यार्थ्यांना कॉलेज प्रवेश दिल्यानंतर कॉलेजकडून देण्यात येणाऱ्या महाविद्यालयीन ओळखपत्रावर **ऑर्गन डोनर (अवयव दाता)** असा **उल्लेख** करावा. यास्तव सर्व पदवी कॉलेजच्या प्रवेश अर्जामध्ये अवयव दानास संमती आहे अगर कसे अशा आशयाचा रकाना अंतर्भूत करणे आवश्यक आहे. अशा प्रकारची कार्यवाही अनुसरल्यास अवयव दान करणाऱ्या व्यक्तींच्या संख्येत वाढ होऊन गरजू रुग्णांना प्रत्यारोपण शस्त्रक्रीयेसाठी अवयव प्राप्त होऊन त्यांना जीवदान मिळू शकेल. या उदात्त कामात सर्व महाविद्यालयांचे सहकार्य अपेक्षित आहे. यास्तव महाविद्यालयीन प्रवेश अर्जामध्ये अवयव दानाबाबतच्या रकान्याचा अंतर्भाव करुन सदर योजना या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्याबाबत राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंना मा.राज्यपाल महोदयांच्या कार्यालयाकडून आवश्यक ते निर्देश देण्याच्या अनुषंगाने यथोचित कार्यवाही व्हावी, अशी विनंती आहे.

आपला, सस्नेह,

( टी.सी.बेंजामिन ) २०/५

प्रति,
श्री.विकासचंद्र रस्तोगी,
मा.राज्यपालांचे सचिव,
राज भवन, मलबार हिल,
मुंबई ४०० ०३५.